ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICNECED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख १४ मे, १९५८ | अंक १०

## विविध माहिती

**केरळमध्यें रेयॉनचा कारखाना**—केरळचें सरकार आणि उद्योगपति बिर्ला ह्यांच्या दरम्यान राज्यांत रेयॉनसाठी लागणारा लगदा तयार करण्याचा कारखाना काढण्यासंबंधींच्या वाटाघाटी पुऱ्या होत आल्या आहेत. कारखान्यांत औद्योगिक शांतता राखण्यासंबंधी जास्तींत जास्त प्रयत्न करण्याचें आश्वासन सरकारनें दिलें आहे.

**कॅने येथील चित्रपट महोत्सव**—कॅने येथें भरविण्यांत आलेल्या ११ व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी 'परेश पाथर' 'मांडू' व 'परदेशी' ह्या चित्रपटांची निवड करण्यांत आली आहे. पैकी 'मांडू' हा अनुबोधपट भारत सरकारच्या चित्रपट खात्यानें तयार केलेला आहे. पहिला चित्रपट सत्यजित रे ह्यांनीं दिग्दर्शित केलेला आहे.

**द्वारका येथील देवळांची दुरुस्ती**—भारत सरकारच्या पुराणवस्तुसंशोधन खात्यानें द्वारका क्षेत्रांतील प्राचीन देवळाची डागडुजी करण्याचें ठरविलें आहे. समुद्रावरील खाऱ्या वाऱ्यापासून देवळाचें संरक्षण करण्याची एक योजना आंखण्यांत आली आहे. तीसाठी ३ लाख रुपये खर्च येईल.

**कापसाच्या निर्यातीवरील जकात**—पाकिस्तान सरकारनें आखूड धाग्याच्या कापसावरील निर्यात जकातींत कपात करण्यांत येणार नाहीं, असें जाहीर केलें आहे. चीन व रशिआ ह्यांच्याकडून कापसाच्या बदला यंत्रसामुग्री घेण्याचा पाकिस्तान विचार करीत आहे. ह्या ऐनजिनसी कराराची पहिली पायरी म्हणून हा निर्णय घेण्यांत आला असावा.

**वाहतुकीसाठी नवी बोट**—मलबार स्टीमशिप कंपनीनें आपल्या परदेशीय व्यापारी वाहतुकीसाठी एक नवी बोट खरेदी केली आहे. बोटीचें वजन १,७०० टन असून ती बेल्जममध्यें बांधण्यांत आली आहे. चालू वर्ष अखेर कंपनीजवळ ६५,००० टन वजनाच्या बोटी होतील.

**३५,००० नव्या विहिरी**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत मुंबई सरकारनें ४९,००० जुन्या विहिरींची दुरुस्ती करण्याचें व ३५,००० नव्या विहिरी खोदण्याच ठरविलें आहे.

**साखर कारखान्यांचे परवाने**—परदेशीय हुंडणावळीच्या टंचाईमुळें ११ संकल्पित सहकारी साखर कारखान्यांना व एका खाजगी मालकीच्या कारखान्याला परवाने नाकारण्यांत आले अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. भारतांत १,००० ते १,२०० टन शक्तीचा साखर कारखाना काढावयाचा झाल्यास प्रत्येक कारखान्यासाठीं ६० ते ७० लाख रुपयांची यंत्रसामुग्री परदेशांतून आणावी लागते.

**डोळ्यांच्या रोगांवर निसर्गोपचार**—मुंबई येथें महिला विद्यापीठाच्या आवारांत डोळ्यांच्या विकारांवर निसर्गोपचार पद्धतीनें उपचार करण्याचें केंद्र एक महिन्यापुरतें चालविण्यांत येत आहे. डॉ. आगरवाल हे ह्या केंद्राचे संचालक आहेत. ते दिल्ली व मद्रास येथें अशा उपचारांचीं इस्पितळें चालवीत असतात.

**हंगेरीमध्यें प्राचीन वसाहत**—दक्षिण हंगेरींत पुराणवस्तु खात्यातर्फे करण्यांत येत असलेल्या उत्खननांत ६,००० वर्षांपूर्वींच्या एका वसाहतीचे अवशेष सांपडले आहेत. ही वसाहत उत्तर आफ्रिकेंतील निग्रो वंशाच्या लोकांची असावी असा तर्क करण्यांत येत आहे. वंशाची सांस्कृतिक पातळी बरीच उच्च असावी असें म्हणतात.

**आफ्रिकेसाठी आर्थिक कमिशन**—संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आर्थिक व सामाजिक कमिशननें आफ्रिकेसाठी एक स्वतंत्र आर्थिक कमिशन स्थापन करण्याचें ठरविलें आहे. ह्या कमिशनमध्यें आफ्रिकेंतील सर्व स्वतंत्र देशांना भाग घेता येईल. कमिशनच्या मुख्य कचेरीची जागा म्हणून आदिस अबाबा शहराला मान्यता देण्यांत आली आहे.

**गोरेगांव येथें नवी वसाहत**—मुंबई राज्यांत गोरेगांव येथें औद्योगिक कामगारांसाठी नवी वसाहत स्थापन करण्यांत येणार आहे. ह्या वसाहतीसाठी मध्यवर्ती सरकारकडून राज्य सरकारला ७,२६,००० रुपयांचें कर्ज मिळणार आहे. चालू वर्षीच्या सप्टेंबर महिन्यापर्यंत वसाहतींतील गाळे बांधून तयार होतील असा अंदाज आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## निर्यात व्यापारांत वाढ करण्याची जरूरी

भारत सरकारचे व्यापारमंत्री श्री. नित्यानंद कानुगो ह्यांनीं देशाच्या निर्यात व्यापारांत वाढ करण्याची जरूरी प्रतिपादन केली आहे. इंडियन कौन्सिल फॉर फॉरिन ट्रेड ह्या संस्थेच्या ५ व्या वार्षिक अधिवेशनांत बोलतांना त्यांनीं असें सांगितलें की देशाच्या निर्यातींत वाढ करण्यासाठीं आणि आयात-निर्यात व्यापारांत समतोलपणा राखण्यासाठीं जरूर तर देशाच्या अंतर्गत बाजारपेठेंतील मालाच्या खपांत घट करण्यांत आली पाहिजे. देशांतील ग्राहकांनीं हल्लींपेक्षां अधिक त्याग करण्याची वेळ आलेली आहे. निर्यात–व्यापाराच्या वाढींत देशांतर्गत बाजारपेठेची एक प्रमुख अडचण आहे ह्यांत शंका नाहीं. ह्या बाबतींत कापडाचे उदाहरण बघण्यासारखें आहे. १९५७ सालीं कापडाला देशांत चांगली मागणी असल्यानें अंतर्गत बाजारपेठेंत कापड विकल्यामुळें परदेशी बाजारपेठांत विक्री केल्यापेक्षां अधिक फायदा होत होता. परदेशी बाजारपेठा हस्तगत करण्यासाठी लोकांनीं आपल्या सर्वच गरजा मारून टाकाव्या, असें म्हणणें योग्य होणार नाहीं. तरीपण पुष्कळशा वस्तूंच्या बाबतींत देशांतील खप आणखी कमी करण्यास वाव आहे. ह्या बाबतींत व्यापारी संघटनांना पुष्कळ कार्य करतां येण्यासारखें आहे. त्यांनीं लोकांना अधिक त्याग करून निर्यातीसाठी अधिक मालाची बचत करण्याचें शिक्षण दिलें पाहिजे. सामान्य लोकांना ह्या बाबतींत अधिक जागरूक करण्यासाठीं व्यापारी संघटनांनीं सर्व प्रकारचे प्रयत्न केले पाहिजेत.

भारतामधील व्यापारी संघटनांनीं नव्या बाजारपेठा काबीज करण्यासाठीं प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. त्याचप्रमाणें भारतामध्यें तयार झालेल्या मालाची परदेशांतून विक्री करण्यासाठी अधिक कुशलता दाखविली पाहिजे. ज्या ठिकाणीं शक्य असेल त्या ठिकाणीं सरकार मदत करीलच; पण निर्यात वाढविण्याचें मुख्य काम व्यापारी संघटनांचें आहे. सागरी वहातुक करणाऱ्यांनाहि ह्या बाबतींत सहकार्य करतां येईल. कारण, ह्या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर काम करणें सरकारला शक्य होणार नाहीं. पक्का माल आणि हलक्या वजनाच्या एंजिनिअरिंगचा माल ह्या दोन प्रकारच्या मालाची निर्यात वाढविणें जरूर आहे. त्याचबरोबर भारतामधून जो माल हल्लीं निर्यात होत आहे त्यांत घट होऊं न देण्याची दक्षता घेतली गेली पाहिजे. हल्लीं जो माल परदेशी बाजारपेठांत निर्यात केला जात आहे तो तसाच पुढेंहि निर्यात केला जाईल आणि त्या बाजारपेठांत कायमचें स्थान मिळवून बसेल ह्यासाठीं पुष्कळच काम करावयाचें अद्याप शिल्लक आहे. अजून बराच काळपर्यंत देशाला मिळणाऱ्या परदेशीय चलनाची गरज ह्याच बाजारपेठांतून होणाऱ्या विक्रीमुळें भागवावी लागणार आहे. परदेशाच्या बाजारपेठांत आतां अधिक स्पर्धा होऊं लागलेली आहे. म्हणून भारतीय व्यापाऱ्यांनीं विक्रीची कला अधिक चांगल्या रीतीनें आंगी बाणवल्यासेरीज त्यांच्या मालाला गिऱ्हाईक मिळणार नाहीं. ताग अथवा जो इतर माल फक्त भारतच पुरवूं शकत आहे त्याहि बाबतींत सावधानता दाखविली पाहिजे. नाहीं तर त्या मालाऐवजीं बदली माल वापरला जाऊं लागेल.

**छोट्या उद्योगधंद्यांना मदत**—कलकत्त्यामधील छोट्या उद्योगधंद्यांना मदत करण्यासाठीं जपानी तंत्रज्ञांच्या साह्यानें एक केंद्र खोलण्यांत येणार आहे. ह्या केंद्रांत उद्योगधंद्यांत काम करणाऱ्यांना शिक्षण देण्यांत येईल आणि त्यांच्या मार्गांत येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी तांत्रिक सल्ला देण्यांत येईल.


## THE TRAVANCORE OGALE GLASS MFG. CO. LTD.

# NOTICE

The Fifteenth Annual General Meeting of Shareholders of The Travancore Ogale Glass Manufacturing Company Limited, will be held at the Registered Office of the Company at the Glass Factory Premises, Manjummel, Alwaye, on Thursday, the 12th June 1958 at 4 p. m. to transact the following business:

1. To read the Notice and Auditors' Report.
2. To receive and adopt the Directors' Report and Audited Balance Sheet and Profit and Loss Account for the year ended 3:st December 1957.
3. To elect a Director in place of Sri. Jacob Cherian who retires by rotation and being eligible offers himself for re-election.
4. To elect a Director in place of Sri. Shankar Rao P. Ogale and being eligible offers himself for re–election, and for the purpose to consider the following resolution as a Special Resolution in respect of which a special notice as required by Section 261 of the Companies Act, 1956, has been received by the Company.

   "Resolved that Sri. Shankar Rao P. Ogale who is a Director of the Company and who retires undr Article 112, being eligible for re–election be and is hereby re–elected a Director of the Company."
5. To appoint Auditors for the current year and fix their remuneration.

The Share Transfer Books of the Company will be closed from Monday the 2nd to Thursday the 12th June 1958, both days inclusive.

A member entitled to attend and vote at the meeting is entitled to appoint a proxy who will attend and vote instead of himself when poll is demanded and the proxy need not be a member.

*By Order of the Board*
**For OGALE BROS. ( Private ) LTD.**
Managing Agents.
**N. P. OGALE**
Director.

MANJUMMEL
Alwaye
March 28, 1958.

Explanatory Statement as required by Section 173 (2) of the Companies Act, 1956.

*Item No. 4.* Under Section 261 of the Companies Act, 1956, it is necessary to propose this resolution as a Special Resolution because Sri. Shankar Rao P. Ogale is a Director of Messrs. Ogale Brothers ( Private ) Ltd., who are the Managing Agents of the Company and therefore, his election as a Director of the Company requires a Special Resolution.

# अर्थ

बुधवार, ता. १४ मे, १९५८



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## नोकरी शोधणाऱ्या शिक्षकांची राज्यवार पहाणी

शिक्षकांना वेतन अतिशय कमी मिळतें. तरी सुद्धां, ह्या व्यवसायांत पडूं इच्छिणाऱ्या सुशिक्षितांची संख्या एकसारखी वाढत आहे. शिक्षकाची नोकरी लवकर मिळूं शकते, असें अर्जदारांना वाटत असलें पाहिजे. उद्योगविनिमय केंद्रामार्फत शिक्षकाची नोकरी मिळवूं इच्छिणारांनीं ह्या व्यवसायाचें शिक्षण बहुधा घेतलेलें नसतें. जानेवारी, १९५५ ते नोव्हेंबर, १९५७ ह्या मुदतींत उद्योगविनिमय केंद्रांकडे शिक्षक होण्यासाठीं आलेल्या अर्जदारांची संख्या एकसारखी वाढत गेली, ती, ३० नोव्हेंबर, १९५७ रोजीं ३४,००० भरली. शिक्षकाच्या व्यवसायाला आवश्यक असणारी लायकी ज्यांची आहे, अशा अर्जदारांत पुरुषांपेक्षां स्त्रियांचा भरणा मोठा आढळला. मध्यम वर्गीय लोकांच्यावर आर्थिक परिस्थितीचा जो परिणाम होत आहे, त्याचें हें प्रतिबिंब आहे. ज्या मानानें अर्जदार वाढले, त्या मानानें उपलब्ध नोकऱ्या मुळींच वाढल्या नाहींत. नोंदलेल्या प्रत्येक १०० अर्जदारांमागें उपलब्ध नोकऱ्यांचे प्रमाण फक्त १२.६ पडलें. लायक शिक्षकांना मध्यप्रदेशांत खूपच वाव आहे. त्या राज्यांत उपलब्ध लायक शिक्षकांच्या १८ पट नोकऱ्या होत्या. मणिपूर, आसाम, त्रिपुरा, हिमाचल प्रदेश, ओरिसा, प. बंगाल आणि राजस्थान येथेंहि लायक शिक्षकांचा तुटवडा आहे. लायक शिक्षकांच्या पुरवठ्याचे बाबतींत पंजाब आणि मद्रास ह्यांचा अनुक्रम पहिला व दुसरा लागतो; केरळ आणि आंध्र हीं राज्यें त्यांच्या खालोखाल येतात. शिक्षिकांचा पुरवठा मद्रासमध्यें सर्वांत अधिक आहे; पंजाब, केरळ, दिल्ली, म्हैसूर आणि आंध्र ह्यांचा अनुक्रम मागाहून येतो. उद्योगविनिमय केंद्रामार्फत नोकरी मिळवूं पाहणाऱ्या स्त्री-उमेदवार शिक्षकांपैकीं शेंकडा ९५ उमेदवार ह्या राज्यांतील आहेत. वेगवेगळ्या राज्यांतील वेगवेगळ्या भाषांमुळें कांहीं राज्यांतून लायक शिक्षकांचा पुरवठा जास्त असला व कांहीं राज्यांतून त्यांचा तुटवडा असला, तरी एकीकडचे शिक्षक दुसरीकडे शिक्षकाचें काम करूं शकत नाहींत आणि पर राज्यांत अल्प वेतनावर जाण्यास कोणी सहसा तयारहि होत नाहीं.

---

## विद्यार्थ्यांच्या वाचनाच्या संवयींची छाननी

शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांतील बेशिस्त हा अलीकडे एक मोठा महत्त्वाचा प्रश्न होऊन बसला आहे. विद्यार्थ्यांच्या मनोरचनेवर ज्या अनेक गोष्टी परिणाम करतात त्यांत ते वाचत असलेल्या पुस्तकांचाहि अर्थातच समावेश होतो. ह्या दृष्टीनें दिल्ली येथील शाळकरी मुलांच्या वाचनाच्या संवयींसंबंधीं जो अहवाल नुकताच प्रसिद्ध करण्यांत आला आहे, तो उद्बोधक आहे. ह्या अहवालावर लवकरच चर्चा घडवून आणण्यांत येणार आहे. त्यापूर्वी अहवालांतील कांहीं निष्कर्षांसंबंधीं माहिती करून घेणें उचित होईल. विद्यार्थ्यांच्या वाचनांत शैक्षणिक दृष्ट्या उपयुक्त आणि आनंददायक अशा प्रकारचीं पुस्तकें फारशी आढळून आलीं नाहींत आणि ह्याचें कारण म्हणून चित्रपटांतील उत्तान भावनांचें उद्दीपन करणारे विषय व रेडिओवरील भावगीतें ह्यांचा उल्लेख करण्यांत आलेला आहे. त्याशिवाय घरांतील वातावरण व मूळ प्रवृत्ति ह्यांचाहि विचार करण्यांत आला पाहिजे असें अहवालांत म्हटलें आहे. ह्या सर्वांचा परिणाम म्हणूनच कीं काय, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दर्जाची पातळी खालावलेली दिसून आली आहे. विद्यार्थ्यांच्या मनोव्यापारावर विपरीत परिणाम घडवून आणणारी परिस्थिति फक्त भारतांतच आहे असें नाहीं. अमेरिकेंत व इंग्लंडमध्यें भेसूर चित्रकथा व टेलिव्हिजन ह्यांच्यामुळें विद्यार्थी विकृतमानस होत असल्याचें आढळून आलें आहे. विद्यार्थ्यांना योग्य अशा प्रकारचें वाङ्मय देऊनच हा प्रश्न सोडविला पाहिजे असें शिक्षण-तज्ज्ञांचें मत आहे.

---

## लंडनमधील बस ड्रायव्हरांचा संप

लंडनमधील बस ड्रायव्हरांनीं संप सुरू केल्यामुळें बृहन् लंडनमधील २,००० चौरस मैलांच्या प्रदेशांतील प्रवाशांची रस्त्यावरील वहातूक जवळ जवळ बंद पडली आहे. संपांत समाविष्ट झालेल्या बसेसची संख्या ८,४०० असून त्या दररोज सुमारें २॥ लाख उतारूंची ने-आण करतात. लंडनमधील भुयारी रेल्वे व उपनगर रेल्वे दररोज सुमारें १० लाख लोकांची ने-आण करतात. अर्थातच लंडनमधील वहातूक-व्यवस्था पूर्णपणें थंडावलेली नाहीं. पण रेल्वेकामगारांनींहि आपल्या वेतनांत ३ टक्के वाढ मागितलेली आहे व ती नाकारल्यास संपाचा धाक घातला आहे. रेल्वेवर संप सुरू झाल्यास गोंधळ माजल्याशिवाय राहणार नाहीं. लंडनमधील बस कामगारांचें म्हणणें असें आहे कीं, युद्धपूर्वकालापेक्षा त्यांची आर्थिक परिस्थिति खालावलेली आहे. रहाणीच्या खर्चांत १७० टक्क्यांनीं वाढ झालेली असून त्यांच्या वेतनांत मात्र ११४ टक्क्यांनींच वाढ झालेली आहे. ह्या उलट, सरकारचें धोरण चलन-वाढीला विरोध करण्याचें असल्यामुळें कामगारवर्गाची वेतनाची पातळी आहे तेथेंच राखण्याचें सरकारनें ठरविलें आहे. अखेर हा झगडा सरकार व लंडनमधील कामगार ह्यांच्या सामर्थ्यावर अवलंबून राहणार असें दिसतें. कारण, कामगार-संघटनेची आर्थिक शक्तीहि कांहीं कमी नाहीं. कामगार संघाजवळ १ कोटी पौंडांचा निधि असून अटीतटीला पेटल्यास संप कित्येक आठवडे चालविण्याइतका त्याचा मगदूर आहे, असें म्हणतात. लंडनमधील संपाच्या यशापयशावर इतर स्थानिक स्वराज्य संस्थांचें लक्ष खिळलेलें आहे.

---

**दिल्लींतील दूरदर्शन केंद्र**—दिल्ली येथें उभारण्यांत येणाऱ्या दूरदर्शन केंद्रांची राहिलेली यंत्रसामुग्री चालू आर्थिक वर्षांत हातीं येईल अशी अपेक्षा आहे. केंद्रासाठीं २ लाख रुपयांची परदेशीय हुंडणावळ लागेल. केंद्र प्रायोगिक स्वरूपाचें असेल व तें मुख्यतः शैक्षणिक कामासाठीं वापरण्यांत येईल.

# THE BANK OF

## BALANCE SHEET AS

| 31-12-1956 Rupees | CAPITAL & LIABILITIES | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| | **1. Capital** | | |
| | *Authorised Capital :* | | |
| 50,00,000 | 1,00,000 Shares of Rs. 50/- each ... | | 50,00,000—00 |
| | *Issued & Subscribed Capital :* | | |
| 32,00,000 | 64,000 Shares of Rs. 50/- each ... | | 32,00,000—00 |
| | *Called and Paid-up Capital :* | | |
| 16,00,000 | 64,000 Shares of Rs. 50/- each | | |
| | Rs. 30/- per share called & paid up ... | 19,20,000—00 | |
| | *Less :* Calls in Arrears : | | |
| | from Directors Nil | | |
| | from Others Rs. 12,175—00 | 12,175—00 | 19,07,825—00 |
| 150 | **Calls in Advance** | | 3,86,430—00 |
| | **2. Reserve Fund and Other Reserves** | | |
| 7,75,000 | *As per last Balance Sheet ... | 10,00,000—00 | |
| 2,25,000 | Additions during the year ... | 1,50,000—00 | 11,50,000—00 |
| 10,00,000 | | | |
| | *(Includes Rs. 2,52,995/- received as premium on issue of shares in past years) | | |
| | **3. Deposits and Other Accounts :** | | |
| 1,93,55,229 | Fixed Deposits ... | 2,65,50,738—76 | |
| 2,52,30,292 | Savings Bank Deposits ... | 2,79,12,089—73 | |
| 1,80,22,675 | Current Accounts, and Contingency Accounts, etc. ... | 2,40,89,929—56 | 7,85,52,758—05 |
| 6,26,08,196 | | | |
| | **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.** | | |
| 10,00,000 | (i) In India ... | Nil | |
| Nil | (ii) Outside India ... | Nil | Nil |
| | **Particulars** | | |
| 10,00,000 | (i) Secured ... | Nil | |
| Nil | (ii) Unsecured ... | Nil | |
| 9,07,571 | **5. Bills Payable** ... | | 12,78,604—83 |
| | **6. Bills for Collection, being Bills Receivable as per contra :** | | |
| 45,56,948 | (i) Payable in India ... | 80,03,847—50 | |
| Nil | (ii) Payable outside India ... | Nil | 80,03,847—50 |
| | **7. Other Liabilities** | | |
| 13,187 | Unpaid Dividend | | |
| 432 | Rebate on Bills Discounted ... | 14,105—46 | |
| 8,09,846 | Branch Adjustments ... | 599—67 | |
| 8,23,465 | ... | 9,25,055—48 | 9,39,760—61 |
| 6,30,570 | **8. Acceptances, Endorsements and other Obligations as per contra :** | | 3,96,373—02 |
| | **9. Profit & Loss :** | | |
| 3,81,744 | Profit as per last Balance Sheet ... | 1,27,913—50 | |
| | *Less :* Appropriation : | | |
| 3,50,000 | Dividend ... | 96,000—00 | |
| 31,744 | | 31,913—50 | |
| 4,01,169 | *Add :* Profit for the year (subject to taxation) brought from the Profit and Loss account ... | 4,69,047—49 | |
| 4,32,913 | | 5,00,960—99 | |
| 1,25,000 | *Less :* Transferred to Reserve Fund Rs. 1,50,000—00 | | |
| 1,80,000 | Provision for Income-tax and Super-tax. Rs. 2,10,000—00 | 3,60,000—00 | 1,40,960—99 |
| 1,27,913 | | | |
| | Carried over ... | | 9,27,56,560—00 |

# MAHARASHTRA LIMITED, POONA

**AT 31st DECEMBER, 1957**

| 31-12-56 Rupees | PROPERTY & ASSETS | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| | **1. Cash** | | |
| 69,79,409 | In hand and with Reserve Bank and State Bank of India (Including Foreign Currency Notes) ... | | 89,34,806—42 |
| | **2. Balances with Other Banks** (In current account) | | |
| 4,69,854 | (i) In India ... | 6,62,986—71 | |
| Nil | (ii) Outside India ... | Nil | 6,62,986—71 |
| 35,00,000 | **3. Money at Call and Short Notice** ... | | 92,00,000—00 |
| | **4. Investments** | | |
| | *Securities*-At or below redemption value : | | |
| 2,51,42,721 | (i) Securities cf the Central and State Governments and other Trustee Securities including Treasury Bills of the Central and State Governments. (Out of these securities of the face value of Rs. 1,19,74,200/- are with Banks for Over-draft arrangements). (Market value Rs. 2,37,19,230-25) (Face value Rs. 2,47,96,564-00) ... | 2,41,34,391—40 | |
| 4,89,503 | (ii) *Shares*: At or below cost. Ordinary Shares (fully paid-up) (Market value Rs. 1,34,975-55) Rs. 1,30,754-02; Preference shares (fully paid-up) (Market value Rs. 3,22,194-50) Rs. 3,21,398-80; Ordinary shares, (partly paid-up) (Market value Rs. 61,618-75) Rs. 61,368-75 | 5,13,521—57 | |
| 67,270 | (iii) Debentures or Bonds: At cost. (Market value Rs. 8,37,600-00) ... | 8,36,820—00 | |
| Nil | (iv) Gold ... | Nil | 2,54,84,732—97 |
| 2,56,99,494 | | | |
| | **5. Advances** (Other than bad and doubtful debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors): | | |
| | (1) Loans, Cash-Credits, Over-drafts etc. | | |
| 2,91,55,911 | (i) In India Rs. 3,68,58,832-36 | | |
| Nil | (ii) Outside India Rs. Nil | 3,68,58,832—36 | |
| | (2) Bills discounted and purchased (Excluding Treasury Bills of the Central and State Governments) | | |
| 4,40,220 | (i) Payable in India Rs. 10,17,209-59 | | |
| Nil | (ii) Payable outside India Nil | 10,17,209—59 | 3,78,76,041—95 |
| | **Particulars of Advances** | | |
| 2,45,16,163 | (i) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured. ... | 3,23,21,003—51 | |
| 21,92,779 | (ii) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security ... | 16,88,654—16 | |
| 28,87,189 | (iii) Debts considered good secured by the personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the Debtors ... | 38,66,384—28 | |
| Nil | (iv) Debts considered doubtful or bad, not provided for | Nil | |
| 2,95,96,131 | | 3,78,76,041—95 | |
| 7,01,544 | (v) Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | 5,69,220—33 | |
| 13,61,775 | (vi) Debts due by companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents, or in the case of Private companies, as Members. ... | 26,93,887—80 | |
| 9,57,418 | (vii) Maximum total amount of advances including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons. ... | 5,69,220—33 | |
| | Carried over ... | | 8,21,58,568—05 |

# THE BANK OF

BALANCE SHEET AS

| 31-12-1956 Rupees. | CAPITAL & LIABILITIES | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| | Brought forward ... | | 9,27,56,560—00 |
| | **10 Contingent Liabilities** | | |
| 1,30,050 | On partly paid shares in joint stock companies held by the Bank as investments including shares of the subsidiary company | 1,54,550—00 | |
| | *Note*:—Provision in respect of future gratuity to the staff has not been made, the liability for which has not been ascertained. | | |
| 7,32,54,813 | Total ... | | 9,27,56,560—00 |

## PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31st DECEMBER 1957

| 31-12-1956 | EXPENDITURE | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| 10,14,144 | 1. Interest paid on Deposits, Borrowings, etc. ... | | 15,67,056—07 |
| | 2. Salaries and Allowances and Provident Fund : | | |
| 21,750 | Manager ... | 23,200—00 | |
| 7,54,206 | Others ... | 9,17,795—25 | 9,40,995—25 |
| 12,375 | 3. Directors' and Local Committee Members' fees and allowances ... | | 11,075—00 |
| 89,299 | 4. Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. ... | | 1,07,596—37 |
| 10,080 | 5. Law Charges ... | | 4,056—94 |
| 56,515 | 6. Postage, telegrams, stamps and telephone ... | | 75,090—99 |
| 3,300 | 7. Auditors' fees (including travelling expenses) ... | | 3,300—00 |
| 59,825 | 8. Depreciation on and repairs to the Banking Company's property ... | | 71,838—20 |
| 1,24,735 | 9. Stationery, Printing, Advertisement, etc. ... | | 1,20,687—91 |
| Nil | 10. Loss from sale of or dealing with non-banking assets ... | | Nil |
| | 11. Other expenditure : | | |
| 52,409 | Sundry charges ... | 65,943—99 | |
| 27,611 | Travelling and Conveyance ... | 22,744—66 | 88,688—65 |
| 4,01,169 | 12. Balance of profit (subject to taxation) carried to Balance Sheet ... | | 4,69,047—49 |
| 26,27,418 | Total ... | | 34,59,432—87 |

| 31-12-1956 Rupees | INCOME ( Less provisions made during the year for bad and doubtful debts and other usual or necessary provisons) | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| 23,13,644 | 1. Interest and Discount ... | | 30,06,454—27 |
| 2,52,295 | 2. Commission, exchange, brokerage ... | | 3,87,428—80 |
| 18,871 | 3. Rent (Less taxes and other charges) ... | | 16,603—31 |
| Nil | 4. Net Profit on sale of investments, gold and silver, land, premises and other assets (not credited to Reserve or any particular fund or account) ... | | Nil |
| Nil | 5. Net profit on revaluation of investments, gold and silver, land, premises and other assets ( not credited to Reserve or any particular fund or account ) ... | | Nil |
| Nil | 6. Income from non-banking assets and profit from sale of or dealing with such assets ... | | Nil |
| | 7. Other receipts : | | |
| 524 | Transfer fees ... | 583—76 | |
| 42,084 | Lockers rental ... | 48,362—73 | 48,946—49 |
| 26,27,418 | Total ... | | 34,59,432—87 |

## REPORT OF THE AUDITORS TO THE SHAREHOLDERS

We have audited the above Balance Sheet of the Bank of Maharashtra, Limited as of 31st December, 1957 and also the above Profit and Loss Account of the Bank for the year ended on that date, in which are incorporated the returns of 8 branches audited by other Auditors and the unaudited returns from 30 other branches not visited by us.

In accordance with the provisions of Section 29 of the Banking Companies Act, 1949, read with the provisions to sub-sections (1) and (2) of section 211 and sub-section (5) of section 211 and section 227(5) of the Companies Act, 1956 the Balance Sheet and Profit and Loss Account are not required to be and are not drawn

# MAHARASHTRA, LIMITED, POONA

## AT 31st DECEMBER, 1957

| 31-12-1956 Rupees | PROPERTY & ASSETS | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| | Brought Forward ... | | 8,21,58,568—05 |
| 23,61,518 | (viii) Maximum total amount of Advances, including temporary advances granted during the year to the companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners, or Managing Agents or in the case of private companies, as Members ... | 30,01,378—56 | |
| 2,08,228 | (ix) Due from Banking Companies ... | 42,541—41 | |
| | **6. Bills Receivable, Being Bill for Collection as per contra** | | |
| 45,56,948 | (i) Payable in India ... | 80,03,847—50 | |
| Nil | (ii) Payable outside India ... | Nil | 80,03,847—50 |
| 6,30,570 | **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and Other Obligations as per Contra :** ... | | 3,96,373—02 |
| | **8. Bank's Premises: Less depreciation.** | | |
| | Cost as at 31st December, 1956 ... | 8,33,454—95 | |
| | Additions during the year ... | 36,400—00 | |
| | | 8,69,854—95 | |
| 7,68,970 | Less total depreciation to-date ... | 82,484—95 | 7,87,370—00 |
| | **9. Furniture, Fixtures, Safe Deposit Vault Etc.:** Less Depreciation :— | | |
| | Cost as at 31st December, 1956 ... | 6,42,814—56 | |
| | Additions during the year. ... | 1,59,911—93 | |
| | | 8,02,726—49 | |
| 4,66,108 | *Less* :—Total depreciation to-date ... | 2,26,304—45 | 5,76,422—04 |
| | **10. Other Assets including Silver** | | |
| 2,520 | Stamps on hand ... | 2,698—79 | |
| 2,32,636 | Tax paid in advance and at source ... | 2,87,052—61 | |
| 1,70,665 | Interest accrued on investments (less tax) ... | 1,63,105—50 | |
| 60,508 | Sundry advances ... | 2,21,122—49 | |
| 1,21,000 | Shares of the Executor and Trustee Co. (Partly paid-up) ... | 1,21,000—00 | 7,94,979—39 |
| 5,87,329 | | | |
| | **11. Non-Banking Assets Acquired in Satisfaction of Claims** (Estimated value Rs. 39,000/-) ... | | 39,000—00 |
| 7,32,54,813 | Total ... | | 9,27,56,560—00 |

**STATEMENT PURSUANT TO SECTION 212 OF THE COMPANIES ACT, 1956 :**

Re :—The Maharashtra Executor and Trustee Company Private Limited, a Subsidiary of this Company. (a) The Bank held 2420 shares of the nominal value of Rs. 100/- each (Rs. 50/- per share called and paid up) out of 2500 shares issued for subscription as at the close of the Company's financial year ending 31st December 1957. (b) The Company made a profit of Rs. 2,198-70 for the year ended 31st December, 1957 and this has not been dealt with in the holding Company's Books. (c) The Company's profits for its previous financial years from 10th April, 1946, the date of its incorporation upto 31st December 1956 after payment of taxation, amount to Rs. 20,843-30. Out of this, amount to the extent of Rs. 20,635-31 being dividends for the relevant years has been dealt with in the holding Company's Books, leaving a net aggregate amount of Rs. 1,714-08 including current year's profit, not dealt with in the Company's Accounts.

*POONA CITY,*
*30th January, 1958.*

P. V. Agashe, *Accountant* — C. V. Joag, *Manager* — V. P. Varde, *Chairman*

N. G. Pawar, D. K. Sathe, F. D. Pudumjee, M. V. Shah, B. M. Gupte, M. B. Jambhekar, M. S. Parkhe — *Directors*

up in accordance with the sixth Schedule of the Companies Act; 1956. The accounts are therefore drawn up in conformity with Forms A & B of the third Schedule to the Banking Companies Act, 1949.

We report that :—

(a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory; (b) The transactions of the Bank which have come to our notice, have been within the powers of the Bank; (c) In our opinion, proper books of Account as required by law have been kept by the Bank so far as appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of our audit have been received from the branches of the Bank; (d) The Bank's Balance Sheet and Profit and Loss Account dealt with by this report are in agreement with the books of account and the returns; (e) In our opinion, and to the best of our information and according to the explanations given to us, the said accounts give the information required by the Companies Act, 1956 in the manner so required for banking companies, and on such basis the said Balance Sheet gives a true and fair view of the state of affairs of the Bank as at 31st December, 1957 and the Profit and Loss Account gives a true and fair view of the profit for the year ended upon that date.

Poona City,
30th January 1958

Kulkarni and Khanolkar,
Chartered Accountants.

G. D. Apte,
B.A., G.D.A., F.C.A. Chartered Accountant

## सहकारी साखर कारखान्यांचे संभाव्य फायदे पदरांत केव्हां पडतील ?

—"साखर कारखाने सहकारी पद्धतीनें काढण्याच्या सरकारी धोरणाचे परिणाम सर्व देशभर दूरगामी ठरण्याचा संभव दिसतो. निदान पश्चिम-महाराष्ट्रांतील-सामाजिक व आर्थिक विकासाच्या दृष्टीनें या कारखान्यांचें महत्त्व फार मोठें आहे हें निर्विवाद आहे. अर्थात्, या सहकारी कारखान्यांची वाढ होतांना समाजहित व कार्यक्षम कारभार हीं दोन्हीं चालकांच्या व सरकारच्या डोळ्यांपुढें राहिलीं तरच त्यांपासून मिळणारे सर्व संभाव्य फायदे आपल्या पदरांत पडतील. साखरेच्या धंद्यांत उसाच्या पैदाशीचें महत्त्व अतोनात आहे; आणि सहकारी कारखान्यांच्या लहान प्रमाणावर शेती करणाऱ्या बहुसंख्य सभासदांना तर या बाबतींत योग्य सल्ला व मार्गदर्शन यांची अत्यंत जरूरी आहे."

—ध. रा. गाडगीळ

---

## छत्रपति शिवाजी सहकारी साखर कारखान्यास घरबांधणीसाठी मध्यवर्ती सरकारचें साह्य

मध्यवर्ती सरकारच्या सहायित औद्योगिक घरबांधणी योजनेसाठी सणसर (पुणें) येथील श्री छत्रपति शिवाजी सहकारी साखर कारखाना लि. या सोसायटीस मध्यवर्ती बांधकाम, घरबांधणी व पुरवठा खात्याकडून २,४७,९४२ रुपयांचें आर्थिक साह्य मिळणार आहे.

वरील मंजूर रकमेपैकी ९९,१७७ रुपये साह्यादाखल व १,४८,७६५ रुपये कर्जाऊ म्हणून मिळतील. ही सोसायटी या रकमेचा विनियोग आपल्या सदर कारखान्याच्या आवारांत एक मजली इमारतींत १५६ एक खोलीचे गाळे बांधण्यासाठी करणार आहे.

---

## हिंदी साखरेची निर्गत कोठें झाली ?

### १९५६–५७ चे आंकडे

| देश | निर्गत केलेली साखर (टन) |
|---|---|
| चीन | ३३,६२४ |
| मलाया | २०,८३७ |
| सिंगापूर | ५,०९६ |
| बर्मा | ११,६४३ |
| सिलोन | ८,१५८ |
| एडन | ८,०५० |
| इराक | १३,०८५ |
| सौदी अरेबिया | १,२४७ |
| प. आशियांतील इतर प्रदेश | ५,०४५ |
| सुदान | १८,८४७ |
| पू. आफ्रिका | २९,४५४ |
| ग्रेट ब्रिटन | १,००२ |
| उत्तर व्हिएतनाम | ८२३ |

---

### हिंदी साखरेचें उत्पादन

| वर्ष | उत्पादन (लक्ष टन) |
|---|---|
| १९५३–५४ | १०·०१ |
| १९५४–५५ | १५·९० |
| १९५५–५६ | १८·६२ |
| १९५६–५७ | २०·२६ |

**भारत युगोस्लाव्हिआ व्यापार**— भारतामधील युगोस्लाव्हिआचे वकिलांनीं उभयता देशांतील व्यापारांत चालू पुष्टी मोठ्या प्रमाणांत वाढ होईल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. उभयता देशांत नुकत्याच झालेल्या व्यापारी करारांत अशा व्यापाराला उत्तेजन देण्यासाठी बरीच दक्षता घेण्यांत आली आहे.

**विद्यार्थ्यांच्या संख्येवर नियंत्रण**—गुजरात विद्यापीठानें आपल्याशीं जोडलेल्या कॉलेजांना १,५०० विद्यार्थ्यांपेक्षा अधिक विद्यार्थी कॉलेजांत घेऊं नयेत अशी सूचना केल्याचें कळतें. त्याचप्रमाणें कोठल्याहि वर्गांत १०० पेक्षा अधिक विद्यार्थी असूं नयेत अशीहि शिफारस कॉलेजांना करण्यांत आली आहे.

**कुतुबमिनारवर विजेचे दिवे**— दिल्ली येथील इतिहासप्रसिद्ध कुतुबमिनार ह्या मनोऱ्यांतील जिन्यांतून वर जाण्यासाठी विजेच्या दिव्यांची सोय करण्यांत आली आहे. फक्त अखेरच्या सज्जावर अद्याप दिवे लागलेले नाहींत. ह्या कामासाठी सुमारें ११,००० रुपये खर्च झाले आहेत.

**करपद्धतींचा अभ्यास**—पश्चिम जर्मनी, स्वित्झरलंड आणि ब्रिटन ह्या देशांतील करपद्धतींचा अभ्यास करण्यासाठीं भारत सरकारचें एक मंडळ त्या देशांत जाणार आहे. भारताच्या करपद्धतींत काय सुधारणा करतां येईल त्यासंबंधीं शिफारसी करता याव्यात म्हणून हा दौरा करण्यांत येत आहे.

**महागाई भत्त्यांत वाढ**—बंगलोर येथील हिंदुस्थान मशीन टूल्स फॅक्टरीच्या चालकांनीं आपल्या नौकरांच्या महागाई भत्त्यांत वाढ करण्याचें ठरविलें आहे. ज्या लोकांना दरमहा ३०० रुपये अगर त्यापेक्षा कमी पगार मिळत असेल त्यांच्या भत्त्यांत जून १९५८ पासून दरमहा ५ रुपयांची वाढ करण्यांत येणार आहे.

**खाणी–मालकांना इषारा**—कोळशाच्या खाणीच्या मालकांपैकी कांहीं मालक कामगारांच्या सुरक्षिततेविषयीं जितकी काळजी घ्यावयास पाहिजे तितकी घेत नाहींत. हें असेंच चालूं राहिल्यास सरकारला ह्या बाबतींत असलेल्या शिक्षा वाढविण्याचा विचार करावा लागेल, असा इषारा मजूरमंत्री श्री. नंदा ह्यांनीं लोकसभेंत दिला.

**हॉलंडमध्यें शाकुंतलाचा प्रयोग**— हॉलंडमधील एका राष्ट्रीय नाट्यमहोत्सवांत कालिदासाच्या शाकुंतल नाटकाचा प्रयोग करण्यांत येणार आहे. शाकुंतल नाटकाच्या इंग्लिश व जर्मन आवृत्त्यांवरून डच भाषेंत रूपांतर करण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणें, नाटकास साजेसें संगीतहि मुद्दाम रचण्यांत आलें आहे.

**भोपाळ जवळ नवी वसाहत**—भोपाळपासून ६० मैलांवर केरळ राज्यांतून आलेल्या लोकांसाठीं एक नवी वसाहत स्थापन करण्यांत आली आहे. केरळमधून आलेल्या १५० भूमि–विहीन कुटुंबांची सोय वसाहतींत करण्यांत येणार आहे. वसाहत स्थापन करण्यासाठी २॥ लाख रुपये खर्च येईल.

**केरळमध्यें नवीन उद्योगधंदे**—अखिल भारतीय कारखानदार संघ आणि केरळचें सरकार ह्यांच्या दरम्यान राज्यांत खाजगी मालकीचे नवीन उद्योगधंदे स्थापन करण्याविषयीं वाटाघाटी चालू आहेत. राज्य सरकारच्या आमंत्रणावरून संघाचें एक प्रतिनिधि मंडळ नुकतेंच केरळच्या दौऱ्यावर गेलें होतें.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.